जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**दिनांक - ३०/१२/२०२३**

**(निरोप समारंभ वार्तांकन) दि.३०/१२/२०२३**

## पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०३,पुणे,श्री.सुहेल शर्मा यांची केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग (CBI) येथे बदली झाल्याने त्यांचे निरोप समारंभा बाबत..

श्री.सुहेल शर्मा,पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ-०३,पुणे शहर यांची केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग येथे बदली झाल्याने पोलीस आयुक्त कार्यालयात निरोप समारंभ आयोजित करण्यात आला होता.

यावेळी पोलीस आयुक्त,श्री.रितेश कुमार यांचे हस्ते श्री.सुहेल शर्मा यांचा सत्कार करण्यात आला. निरोप समारंभास अपर पोलीस आयुक्त,प्रशासन,श्री.अरविंद चावरिया, अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे) व पोलिस सह आयुक्त अतिरिक्त कार्यभार,श्री.रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त,पश्चिम प्रादेशिक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील, पोलीस उप-आयुक्त,(गुन्हे),श्री.अमोल झेंडे, पोलीस उप-आयुक्त,परि-०२,पुणे,श्रीमती.स्मार्तना पाटील, पोलीस उप-आयुक्त,वाहतुक,पुणे, श्री.विजय मगर, पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय,श्री.रोहीदास पवार, नवनियुक्त मा.पोलीस उप-आयुक्त,परिमंडळ -३ श्री.संभाजी कदम तसेच इतर अधिकारी / अमंलदार उपस्थित होते.

श्री.सुहेल शर्मा हे भारतीय पोलीस सेवा (आय.पी.एस.) म्हणुन २०१२ रोजी रूजु झाले. त्यांनी च्रंद्रपुर या जिल्हयातुन आपल्या पोलीस कारकिर्दीला सुरूवात केली. त्यानंतर त्यांनी बुलढाणा, कोल्हापुर, सांगली, मुंबई आणि पुणे शहर येथे उत्कृष्टरित्या कर्तव्य बजावले आहे. २०१६ मध्ये उत्तर (चीन) चे बाजुने जगातील सर्वात उंच शिखर माऊंट एव्हरेस्ट यशस्वीरित्या चढाई करणारे ते पहिले (आय.पी.एस.) अधिकारी देखील आहेत. या साहसा बरोबरच त्यांनी ऑक्सफर्ड या विद्यापीठातुन कायदा व धोरणे यामध्ये पदव्युत्तर पदवी देखील मिळविली आहे.

पुणे शहर पोलीस आयुक्तालया मध्ये दि.१५/११/२०२२ रोजी त्यांनी पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-०३, म्हणून कार्यभार स्वीकारला. पोलीस उप-आयुक्त म्हणुन कर्तव्य बजावित असताना, त्यांनी परिमंडळ-०३ मधील संवेदनशील व महत्वाचे गुन्हयाचा तपास उत्कृष्ठपणे करुन,सदर गुन्हे उघडकीस आणणेकामी अधिपत्याखालील अधिकारी यांना योग्य मार्गदर्शन केले आहे. त्यांना दि.२५/१२/२०२३ रोजी पोलीस आयुक्तालयाचे आस्थापनेवरून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभाग याठिकाणी झालेल्या बदलीवर मोकळीक करण्यात आलेली आहे.

